**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**वर्धा कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार १६ जानेवारी २०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज ( दिनांक १६ ते २० जानेवारी २०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ | २०/०१ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | २९.६ | २९.८ | ३०.५ | ३०.५ | ३१.२ |
| किमान तापमान (अं.से.) | १२.६ | १२.८ | १३.५ | १४.५ | १५.५ |
| वा-याची दिशा | ४८ | ५२ | ५५ | ६० | ५० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ४३ | ४६ | ५० | ४९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २ | २ | २ | २ | २ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ९० | १०९ | १५८ | ३० | |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक १५-१९ जानेवारी २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कपाशी | वेचणी | पिकाचा हंगाम आता संपवून किडग्रस्त बोंडासहित पराटया जमा करून त्याचा शेंद्रीय खात करण्यासाठी उपयोग करावा.<br>वेचणीचे कामे अंतिम टप्यात आहेत, वेचणी पूर्ण झाल्यावर पिकाची फरदड घेवू नये.<br>कापूस संकलन केंद्र व साठवणूक ठिकाणी शेंदरी बोंडअळीच्या वेवास्थापनसाठी कामगंध सापळ्याची मदत घावी व त्यामध्ये सापडलेल्या प्रौढ अवस्थेतील बोंडअळीची नियमित वेचणी करावी, त्यामुळे पुढील वर्षी त्याचा प्रादुर्भाव कमी होईल. |
| तूर | फुल | वेळेवर पेरणी केलेले तूर पिक शेंगा पक्वता ते काढणीच्या अवस्थेत आहे, काढणीला आले असल्यास पिकाची काढणी करून माल तयार करावा व तयार झालेला सुकलेला मालची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

| | | |
|---|---|---|
| हरभरा | फुल | हरभरा पिकास ओलिताची गरज असल्यास पाणी द्यावे.<br>घाटेअळीच्या सर्वेक्षण व नियंत्रणसाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच २० पक्षी थांबे प्रती हेक्टरी उभारावेत.<br>हरभरा पिकाची पाहणी करावी व हरबरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसताच घाटे अळीने आर्थिक नुकसानाची पतळी (१-२ अळ्या प्रती ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि (१x१०९ पिओबी / प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी) ५०० एल.ई / हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम किंवा ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मि.ली. किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्युजी ५ मि.ली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वाढ | वेळेवर पेरणी केलेल्या गहू पिकला पहिले ३०-४० दिवस तण मुक्त ठेवावे.<br>नोव्हेंबर महिन्यात पेरलेल्या बागायती गव्हास पेरणीनंतर १८ ते २०, ३० ते ३५ , ४५ ते ५० व ६५ ते ७० दिवसांनी अनुक्रमे मुकूटमुळे अवस्था, जास्तीत जास्त फुटवे अवस्था, कांडीअवस्था व फुलोर अवस्थेत ओलीत करावे. |
| भुईमुग | पेरणी | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी थंडीचा अंमल कमी होण्यास सुरवात झाल्यावर म्हणजे जानेवारीच्या दुसर्या पंधरवड्यातते फेब्रुवारी च्या पहिल्या आठवड्या पर्यंत रुंद वाफासरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. पेरणीसाठी टीएजी -२४ किंवा एसबी-११ वाणाची निवड करावी त्यासाठी बियाणे हेक्टरी १२५ किलो वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ५ ग्रॅम/किलो, या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| फळझाडे | फुल | करडई पिकास ढगाळ वातावरणामुळे पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसताच डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढ | कांदा पिकाची ६ ते ८ आठवड्याचे रोपे सपाट वाफ्यामध्ये १० x १० सें. मी. अंतरावर जानेवारीच्या पहिल्या पंधरवाड्यात लागवड करावी. कांदा पिकाची पुनर्लागवड करताना रोपांची मुळे डायथेन ४५ @ २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी द्रावणात बुडवावे.<br>वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ % निंबोळी अर्क ५० मिली प्रति १० लिटर किंवा सायपरमेथ्रीन २५ %, ५ मिली प्रति १० लिटर या प्रमाणात फवारावे.<br>शिफारसीनुसार या महिन्यात भेंडी, गावर, चावळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबुज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीरची लागवड करावी व त्यांचे ठिबक किंवा सिंचन पद्धतीने ओलीत वेव्स्थापन करावे. |

| | | |
|---|---|---|
| पशु / जनावरे | - | जनावरांना पायखुरी व तोंडखुरी रोगाची प्रतिबंधक लस पशु दवाखान्यात नेऊन टोचावी जनावरांना .स्वच्छ पाणी पाजावे व त्यांच्यासाठी चारा पिकांची लागवड करावी |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.